# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१३ – १४

## साहेबरावजी बुट्टपाटील स्मृती व्याख्यानमाला

पुणे जिल्हा ५ पुढारी | पुणे, गुरुवार ३० जानेवारी २०१४

# ‘पसायदान’ हा जागतिक शांततेचा नकाशा

## पंडित हृदयनाथ मंगेशकर यांचे साहेबराव बुट्टे-पाटील व्याख्यानमालेत प्रतिपादन



**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

संत ज्ञानेश्वरमहाराजांचे ‘पसायदान’ हा जागतिक शांततेचा नकाशा आहे. त्याचे आचरण होण्याची गरज असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ संगीतकार, गायक पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात साहेबराव बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानमालेचे हे १३ वे वर्ष आहे. बुधवारी (दि. २९) चौथे पुष्प हृदयनाथ मंगेशकर यांनी ‘एक मनोगत’मधून गुंफले. संगीत, गायनाबरोबरच संतवाङ्मय-गीतरचना यावर बोलताना मंगेशकरांनी अनेक आठवणी श्रोत्यांसमोर मांडल्या. गीतरचना बनवताना, लय-चाल तयार होताना घडलेले प्रसंग विशद केले.

अभंग, लोकगीत, शास्त्रीय संगीत, लावणी, भावगीत, भैरवी, कोळीगीत अशा विविध गीत-संगीत प्रकारांतील माहिती त्यांनी दिली. ‘येरे घना... येरे घना... न्हाऊ घाल माझ्या मना,’ ‘इवलेसे रोप लावियेले द्वारी’ या भक्ती व भावगीतांबरोबरच ‘राहिले दूर घर माझे,’ ‘तिन्हीसांजा सखे मिळाल्या,’ कोळीगीत ‘माझ्या सारंगा’ आणि ‘रेशमाच्या रेघांनी’... हे लावणीप्रधान गीत कसे तयार झाले याची सविस्तर माहिती मंगेशकरांनी दिली.

स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर, आशा भोसले या भगिनी, कवयित्री शांता शेळके, चित्रपट निर्मिति-दिग्दर्शक भालजी पेंढारकर, पंडित रवीशंकर, भा. रा. तांबे, आरती प्रभू आदींबरोबरच्या विविध आठवणीही त्यांनी सांगितल्या. स्वत:ला कळत नाही ते दुसऱ्याला विचारण्याची चांगली सवय जोपासल्याने जीवनात यशस्वी होता येते. हाच मंत्र आयुष्यभर जोपासला. प्रत्येकाने काम-कर्म हाच ईश्वर मानला पाहिजे, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी मंगेशकर यांचे स्वागत केले. कु. प्रतिभा कराळे हिने परिचय करून दिला.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख